महाराष्ट्र शासन

क्रमांक- माहप्र २०१३/(७१/१३)माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१३.

प्रति,
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांचे नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याबाबत.

संदर्भ :- समक्रमांकाचे दि.१९ जून, २०१३ चे पत्र

वरील विषयावरील संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. संदर्भाधीन पत्रान्वये सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांच्या संदर्भातील मान्यता / ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने येथे स्पष्ट करण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अधिनियमांमधील तरतुदी विचारात घेता यापूर्वी शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्यस्थितीत शासन परवानगीशिवाय सुरु असलेल्या विविध शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ च्या अनुषंगाने विहित केलेले निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असतील तर अशा शाळांना शासन स्तरावरुन परवानगी आहे असे गृहित धरुन मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन करण्याबाबतच्या

सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. जेणे करुन अशा शाळांना शासन स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्याची पुढील कार्यवाही करतो येणे शक्य होईल.

(सु.न. जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

<u>प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-</u>

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हा परिषदा
३. [illegible]

---

क्र.माशि/नाहप्र/२०१३/सीबीएसई/१५-क (५) / ८०२६
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे १ दिनांक १६/९/२०१३

(17 SEP 2013)

उपरोक्त शासन पत्रात दिलेल्या आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

(सर्जेराव जाधव)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

प्रति

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषदा,
शिक्षण निरीक्षक, (उत्तर / दक्षिण / पश्चिम)
शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे (समादराने)